
Dr. choudhari

ISSN 2320 - 4494
RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Peer Review Reasearch Journal

Volume : II Issue : III Oct- Dec. 2018



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor
**Sarkate Sadashiv Haribhau**
Email : powerofknowledge3@gmail.com, shsarkate@gmail.com

75

अनुक्रमणिका (Index)



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | Role of media in popularizing game of Kabaddi | Prof. Dr. Vilas Gunde-Patil | 6 |
| 2 | Communication Skills in English | Dr. Vaishali S. Rokade | 10 |
| 3 | बहिणाबाई चौधरी यांचे जीवनविशयक तत्त्वज्ञान | प्रा.डॉ.सविता माधवराव पवार | 14 |
| 4 | मानवाधिकार आणि आदिवासी समुदाय | प्रा. डॉ. साळुंके जयसिंग ज्ञानदेव | 19 |
| 5 | नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे कार्य (इ.स.1897 ते 1945 ) | प्रा. डॉ. शिवाजी लक्ष्मण नागरगोज | 22 |
| 6 | भारतातील आधारभूत संरचनेतील गुंतवणुक आणि विविध कार्य(म | प्रा. डॉ. पी. डी. जाधव | 24 |
| 7 | प्रसार माध्यमाद्वारे प्रदर्शित स्त्री | प्रा. इरलापल्ले पल्लवी | 30 |
| 8 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजसुधारणांचे कार्य | डॉ. के. बी. शिरसे | 32 |
| 9 | मध्ययुगीन मराठी वाङ्मय आणि तौलनिक साहित्याभ्यास | प्रा. संदीप उल्हाळकर | 36 |
| 10 | बहिणाबाईंच्या कवितांमधील तत्त्वज्ञान व कृषी संस्कृती | प्रा. सुधीर माने | 41 |
| 11 | मराठी दलित कविता | प्रा.डॉ. शकुंतला एम.भारंबे | 45 |
| 12 | हुंडा प्रथेचे सामाजिक दुष्परिणाम | प्रा.डॉ. बानायत जी. एच. | 49 |
| 13 | निर्मल वर्मा के कहानियों में आधुनिक बोध | प्रा. डॉ. कलशेट्टी एम. के. | 53 |
| 14 | समकालीन राजनीतिक काव्य में सामाजिक चेतना | डॉ. संतोष रामचंद्र आडे | 56 |
| 15 | विद्रोह : स्वरुप, संकल्पना आणि परंपरा | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 63 |
| 16 | २१ व्या शतकातील संयुक्त राष्ट्र संघाची उद्दिष्टे | प्रा.चौधरी के.पी. | 72 |
| 17 | महाराष्ट्रातील आदिवासींचे आर्थिक जीवन | प्रा.डॉ. विठ्ठल जीवतोडे | 76 |
| 18 | Theory of Structuralism and post structuralism including Deconstruction | Prof. M. C. Talware | 81 |
| 19 | समाजभान अभिव्यक्त करणारी पी. विठ्ठल यांची कविता | प्रा. डॉ. मारोती माधवराव घुगे | 83 |
| 20 | भळभळत्या जखमांचा हुदुंका- लतिका चौधरी यांची कादंबरी | प्रा. डॉ. शिशकांत पाटील | 88 |





76

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | भळभळत्या जखमांचा हुंदका- लतिका चौधरी यांची कादंबरी | प्रा. डॉ. शिशकांत पाटील | 88 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय कृषिविषयक विचार व कार्य | प्रा. डॉ. बोकारे तुकाराम एकनाथराव | 92 |
| 23 | विज्ञापन और हिंदी भाषा | प्रा. पठाण जयनुल्लाखान | 95 |
| 24 | उषा प्रियंवदा के उपन्यासों में सामाजिक चेतना | प्रा. डॉ. उत्तम जाधव | 98 |
| 25 | स्वतंत्रता पूर्व प्रगतिवाद में मानवीय चेतना | प्रा.डॉ. मिरगणे अनुराधा जनार्दन | 101 |




77

*Power of Knowledge Peer Review Journal, Volume :II, Issue:III Oct.to Dec.2018 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286*

# २१ व्या शतकातील संयुक्त राष्ट्र संघाची उद्दिष्टे

**प्रा.चौधरी के.पी.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
महिला महाविद्यायल, गेवराई जि.बीड

राजकीय, आर्थिक व जागतिकीकरणाच्या संदर्भात संयुक्त राष्ट्र संघाची महत्वपूर्ण माहिती. 24 ऑक्टोंबर 1945 मध्ये संयुक्त राष्ट्र अस्तित्वात आले आणि म्हणूनच 24 ऑक्टोंबर संयुक्त राष्ट्राचा स्थापना दिवस म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्राच्या घटनेत एकूण 111 कलमे आणि 19 प्रकरणे आहेत. त्यात राष्ट्रांची कार्य रचना, अधिकार तसेच सदस्य राष्ट्रांचे अधिकार आणि त्यांच्या व्यवहारावरील बंधने विषयक तरतुदी आहे.

संयुक्त राष्ट्र संघाचे सहा प्रमुख घटक असून यामध्ये आमसभा, सुरक्षा परिषद, आर्थिक आणि सामाजिक परिषद, विश्वस्त समिती, आंतरराष्ट्रीय न्यायालय तसेच सचिवालयाचा समावेश आहे. सदस्य राष्ट्रांकडून मिळणाऱ्या निधीवर संयुक्त राष्ट्राचा खर्च भागवला जातो. कोणत्या सदस्याकडून किती खर्च घ्यायचा हे आमसभेद्वारे निश्चित केले जाते. संयुक्त राष्ट्राचा वार्षिक अर्थसंकल्प चार अमेरिकन डॉलर्स एवढा आहे. संयुक्त राष्ट्राच्या कुटुंबात सहा प्रमुख घटकांशिवाय पंधरा मुख्य संस्था अस्तित्वात असून त्यांच्या समित्या व उपसमित्या मार्फत विविध कार्यक्रम राबविले जातात.

स्थापनेच्या वेळी संयुक्त राष्ट्राची सदस्य संख्या 50 होती, आता ती 192 झालेली आहे. 1971 साली सध्याच्या साम्यवादी 'पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना' ला संयुक्त राष्ट्राचे तसेच सुरक्षा परिषदेचे सदस्यत्व बहाल करण्यात आले होते. संयुक्त राष्ट्राचे मुख्यालय न्यूयॉर्क येथे असून इतर संस्थांची मुख्यालय रोम, हेग, आदिस अबाबा, मॉंटेरीयल कोपेनहेगन आणि बॉन इत्यादी शहरांमध्ये आहेत.

- संयुक्त राष्ट्राचा प्रत्येक सदस्य हा आम सभेचा सदस्य असतोच.
- संयुक्त राष्ट्राची घटना मान्य असणाऱ्या कोणत्याही शांतताप्रिय राष्ट्राला संयुक्त राष्ट्राचा सदस्य होता येतं.
- सदस्यत्वासाठी सुरक्षा परिषदेची शिफारस आणि आमसभेची मान्यता आवश्यक समजली जाते.
- सदस्य राष्ट्राशिवाय एकाच सार्वभौम राज्याला, म्हणजेच होलिसीला कायम निरीक्षकांचा दर्जा 1964 पासून देण्यात आला आहे. हा दर्जा नॉन मेंबर ऑबझर्वर स्टेट या नावाने देण्यात आला आहे.
- 1991 ते 2008 या काळात 33 नवीन राष्ट्रांना संयुक्त राष्ट्राचे सदस्यत्व बहाल केलेले असून कॉंटेनेग्रो हे 192वे सदस्य राष्ट्र म्हणून सामावून घेण्यात आले आहे.

**संयुक्त राष्ट्रसंघाची उद्दिष्टे**

1. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविणे.
2. सर्व राष्ट्रांमध्ये शांतता, सहकार्य आणि मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करणे.

3. राष्ट्रा–राष्ट्रांमधील संघर्ष, प्रश्न, वाद, सहकार्य आणि चर्चेच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न करणे.

4. सर्व सदस्य राष्ट्रांचा सहकार्याच्या माध्यमातून सर्वांगिन विकास साधने.

5. मानवी अधिकाराचे संरक्षण करणे, तसेच या अधिकाराचा प्रसार करण्याबरोबरच अधिकाराविषयी जनमत संवेदनशील बनविणे.

6. सर्व सदस्य राष्ट्रां सोबतच दुर्बल राष्ट्रांच्या स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करणे.

संयुक्त राष्ट्राजवळ स्वतःची उत्पन्नाची साधने नाहीत. या संघटनेचा संपूर्ण खर्च सर्व सदस्य राष्ट्रांनी दिलेल्या आर्थिक मदतीवर भागविला जातो. संयुक्त राष्ट्राच्या आमसभे कडून अर्थसंकल्पाला मंजुरी दिली जाते कोणत्या सदस्याकडून किती मदत घ्यावी हे ठरविण्याचा अधिकार आमसभेला आहे. संयुक्त राष्ट्राचा अर्थसंकल्प पाच अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढा असून त्यापैकी बहुतांश पैसा शांती सैनिक मोहिमेवर खर्च केला जातो. संयुक्त राष्ट्राला सर्वात जास्त आर्थिक मदत अमेरिकेकडूनच होते. त्याखालोखाल जपान, जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स, इटली आणि कॅनडा या राष्ट्रांचा क्रमांक लागतो. संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती केवळ जगाला तिसऱ्या महायुद्धा पासून वाचविण्यासाठी झालेली नसून सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक विकास व्हावा म्हणून झालेली आहे. आर्थिक आणि सामाजिक प्रगती शिवाय शांतता आणि सहकार्य शक्य नसल्याने आर्थिक आणि सामाजिक समित्यांची निर्मिती करण्यास आलेली आहे. यात 54 सदस्य असून या समितीची वर्षातून दोनदा बैठक होते, वेळ प्रसंगी विशेष बैठक आमंत्रित केली जाते.

**आर्थिक उद्दिष्टांअंतर्गत संयुक्त राष्ट्र संघाने**

1. आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक, सामाजिक तसेच आरोग्य विषयक समस्या सोडविणे तसेच शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात प्रगतीसाठी सदस्य राष्ट्रांमध्ये सहकार्य निर्माण करणे हे यापुढील उद्दिष्ट निश्चित केलेले आहे.

2. सदस्य राष्ट्रांचा आर्थिक आणि सामाजिक विकासासह जीवनस्तर उंचावणे व रोजगार निर्मिती हीदेखील उद्दिष्टे आहेत.

3. मानवी अधिकाराच्या रक्षणासाठी सदस्य राष्ट्रांमध्ये परस्परांविषयी जाणिव आणि आदर निर्माण करणे हेदेखील महत्त्वाचे उद्दिष्ट आहेत.

10. डिसेंबर 1948 ला संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने मुलभूत मानवी अधिकाराचा जाहीरनामा घोषित केला नागरी आणि राजकीय अधिकारांविषयी आंतरराष्ट्रीय ठराव 1966 मध्ये करण्यात आला. या ठरावानुसार मानवी अधिकाराला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले तसेच त्याच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्नही करण्यात येत आहे. राजकीय अधिकाऱ्यांच्या संरक्षणा करिता

1. मानवी अधिकारांचे संहितीकरण.

2. राजकीय आणि नागरी अधिकारांसाठी अंतरराष्ट्रीय कराराचा मसुदा.

3. अल्पसंख्यांकांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी विशेष तरतुदी.

4. धर्म, वंश, भाषा, लींग या आधारावर केला जाणारा भेदभाव नष्ट करण्यासाठी प्रयत्नपूर्वक कायदा करणे.

राजकीय आणि नागरी हक्कासंबंधीचा आंतरराष्ट्रीय करारनामा सन 1966 मध्ये संमत झाला.

या कराराच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असणारी पस्तीस राष्ट्रांची स्वीकृती सन 1976 मध्ये प्राप्त झाली. या करारनाम्यात

1. व्यक्तीच्या अस्तित्वाचा आणि जगण्याचा अधिकार.
2. व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्या संबंधी अधिकार.
3. समूहाचे अधिकार
4. राजकीय अधिकार प्रधान करणे या मूलभूत प्रक्रियांचा समावेश करण्यात आला यावर 130 पेक्षाही जास्त राष्ट्रांनी स्वाक्षऱ्या केल्या.

जागतिक पातळीवर शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे हा संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेच्या मूळ उद्देश होता. तिसऱ्या महायुद्धाच्या धोक्यापासून जगाला वाचविण्याच्या उद्देशात संयुक्त राष्ट्रसंघाला बरेचसे यश प्राप्त झाले आहे. त्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाचे जागतिक पातळीवरील योगदान जर लक्षात घेतले तर राष्ट्रा–राष्ट्रांमधील संघर्ष सोडविण्याच्या .ष्टीने संयुक्त राष्ट्रसंघाला वेळोवेळी आमंत्रित केले जाते.

हा संघर्ष सोडविण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघ वेळोवेळी लवादाची नेमणूक करतो. काश्मीरच्या प्रश्नावरून भारत आणि पाकिस्तान मध्ये असलेला संघर्ष शांतता आणि चर्चेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातात, एवढेच नव्हे तर राष्ट्रांनी आपसातील प्रश्न संघर्ष पेक्षा सहकार्याच्या मार्गाने सोडविण्यावर संयुक्त राष्ट्राकडून पुढाकार घेतला जातो. नागरी संघर्षावर तोडगा काढण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ राजनयाचा, शांती मोहिमांचा, चर्चा व वाटाघाटींचा प्रयत्न केला जातो.

जागतिक पातळीवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी आपत्कालीन परिस्थितीत बळी पडलेल्या राष्ट्रांना तात्काळ मदत करणे, तसेच अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये यासाठी दक्षता घेणे, निर्वासितांचा पुनर्वसना साठी प्रयत्न करणे. संयुक्त राष्ट्रसंघाने 2001 ते 2010 हे दशक वसाहतींच्या निर्मूलनासाठी आंतर्राष्ट्रीय दशक म्हणून घोषित केले. 2007 ते 2008 हे वर्ष अहिंसा वर्ष म्हणूनही घोषित केले.

**संयुक्तराष्ट्रा समोरील आव्हाने**

1. पर्यावरणाचे संरक्षण.
2. अमली पदार्थांवर बंदी.
3. निर्वासितांचे प्रश्न सोडविणे.
4. संघटित गुन्हेगारी विरुद्ध संघटितरीत्या प्रयत्न करणे.
5. एड्स सारख्या रोगाचा सामना करणे.
6. आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरुद्ध सामूहिक प्रयत्न करणे.
7. जीवघेणी वाढती शस्त्रास्त्र स्पर्धा थांबविणे.

**उपाय योजना**

1. सुरक्षा परिषदेची सदस्य संख्या वाढविणे.
2. सुरक्षा परिषदेतील कायम सदस्य राष्ट्रांच्या नकाराधिकारावर अंकुश लावणे.



80

3. दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या राष्ट्रावर बहिष्कार घालने.
4. दहशतवादाच्या निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर योजना आखने.

**संयुक्त राष्ट्र संघाचे कार्य**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्याला पाच श्रेणीमध्ये विभाजित केले असून यात प्रामुख्याने

1. व्यवस्थेसंबंधी कार्य.
2. प्रशासना संबंधी कार्य.
3. अल्पसंख्यांकांच्या सुरक्षितेसंबंधी कार्य.
4. सामाजिक व आर्थिक कार्य.

असे हे विभाजन करण्यात आलेले आहे.

प्रशासकीय कार्यात सार प्रदेशातील कार्याला सर्वात जास्त यश प्राप्त झाले आहे. अल्पसंख्यांकांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत एक राष्ट्र एक राज्य हा सिद्धांत लागू करण्यात आला असून यानुसार एका राष्ट्राला एका राष्ट्राच्या सिमे अंतर्गत त्या राष्ट्रीयत्वाच्या लोकांचाच निवास राहील. सामाजिक कार्य अंतर्गत संयुक्त राष्ट्र संघाने स्त्रिया आणि बालके यासंदर्भात स्त्री आणि बालकांच्या विक्रीबाबत कठोर पाऊले उचललेली आहेत. त्याचप्रमाणे अंमली पदार्थांच्या सेवनावर आणि विक्रीवर बंदी घालून आरोग्यविषयक प्रश्नांनाही हात घातला आहे. अशा तऱ्हेने संयुक्त राष्ट्र संघाने अनेक समस्यांची यशस्वीरीत्या हाताळणी केलेली असून संयुक्त राष्ट्र संघाचे हे योगदान नाकारता येत नाही. संयुक्त राष्ट्र संघाला यामुळेच जागतिक युद्धावर नियंत्रण बसविणे सहज शक्य झाले आहे.

**संदर्भग्रंथ :–**

1. आंतरराष्ट्रीय संबंध – व्ही एन खन्ना, विकास पब्लिकेशन हाऊस प्रायव्हेट लिमिटेड, 28 सेक्टर 8 नोयडा.
2. आंतरराष्ट्रीय संबंध – डॉ. शांताराम भोगले, विद्या प्रकाशन, नागपूर.
3. आंतरराष्ट्रीय संबंध – श्री प. सोहोनी, विद्या प्रकाशन, नागपूर.
4. आंतरराष्ट्रीय संबंध – प्राध्यापक शेख हाशम, डॉ. जोगेंद्र गवई , विश्वपब्लिशर्स ॲड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर.
5. आंतरराष्ट्रीय संबंध – रा.ज. लोटे पिंपळापुरे ॲड सन्स, नागपूर.



81